१९९०

# शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती
# (महाराष्ट्र)

कार्यालय : ५४ बुधवार पेठ, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मी रोड, पुणे – ४११००२.

# मजूर मंत्र्यांना पाठविलेले निवेदन

विषय : शेतमजुरांच्या किमान वेतनाची तात्काळ पुर्नरचना करून ग्रामीण कष्टकऱ्यांसाठीच्या, राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाच्या शिफारशी लागू करा.

महोदय,

आपला देश शेतीप्रधान आहे. मात्र शेतातील सर्व कारभार ज्यांच्या जीवावर चालतो तो ग्रामीण कष्टकरी म्हणजेच शेतमजूर. याची अवस्था अत्यंत शोचनीय झाली आहे हे आज कोणीही नाकारत नाही. थोडीबहुत जमिन-जुमला असणारांना व पूर्वापार बलुतेदारी करणारांना देखील वर्षातून ६, ८ महिने तरी शेतमजुरी करावीच लागते अशी स्थिती आहे. शेतमजूर व ग्रामीण कष्टकऱ्यांना माणूस म्हणून जगण्यासाठी किमान सोयी सवलतीयुक्त कायद्याची अत्यंत गरज आहे. त्याच बरोबर वाढत्या महागाई बेकारीचा मुकाबला करता यावा म्हणून आपल्याकडील रोजगार हमी योजनेची काटेकोर अंमलबजावणी तर व्हायला हवीच पण या घटकेला महागाई पासून संरक्षण मिळण्यासाठी कष्टावर आधारीत व महागाई निर्देशांकाशी जोडलेले किमान वेतन निश्चित व्हायला हवे अशी आम्ही मागणी करत आहोत.

## शेतमजुरांसाठी सर्वकक्ष केंद्रीय कायदा करा :

शेतमजुरांसाठी किमान वेतन, रोजगाराचा प्रश्न, भविष्य निर्वाह निधी, उपादान, नुकसान भरपाई, आरोग्याच्या सोयी-सवलती, निवाऱ्याच्या सोयी, निवृत्ती वेतन इत्यादि सामाजिक सुरक्षितता व कल्याणकारी योजना आणि याबाबत निर्माण होणाऱ्या विवादांची सोडवणूक व शेत-मजुरांचे अन्य जिव्हाळ्याचे प्रश्नाबाबत केन्द्र सरकारने सर्वंकश कायदा करावा अशी मागणी मजूर संघटना गेले कित्येक वर्षापासून करत आहे. पण त्याबाबत अद्याप कोणतीही ठोस कृती झालेली नाही हे सखेद नमूद करावे लागत आहे. केरळ सरकारने आपल्या राज्यापूरता का होईना १९७४ साली शेतमजूर कायदा केला. वरील सर्व तरतुदींचा या कायद्यात समावेश आहे. या कायद्याची प्रशंसा करून केन्द्र सरकारने या धरतीवर कायदा करावा अशी सूचना १९७५ साली झालेल्या २६ व्या मजूर मंत्री परिषदेने केली होती. केरळ सरकारच्या या कायद्यात काही दुरुस्त्या करून लोकसभेने नियुक्त केलेल्या एका समितीने केन्द्रीय कायद्याचा एक मसूदा १९८१ मध्ये झालेल्या मजूर मंत्र्यांच्या परिषदे समोर ठेवला होता, पण त्याही वेळी यावर निर्णय होऊ शकला नाही. १९८२ व्या मजूर मंत्र्यांच्या परिषदेमध्ये प्रत्येक राज्याने आपला स्वतंत्र शेतमजूर कायदा करावा अशी शिफारस केली. त्याप्रमाणे फक्त त्रिपूरा सरकारने १९८७ साली आपल्या राज्यासाठी शेतमजूर कायदा केला. मात्र हे खेदाने नमूद करावे लागते की, महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्यासाठी शेत मजूर कायदा व्हावा म्हणून कोणतीही हालचाल केली नाही.

केन्द्र शासनाने ११ ऑगस्ट १९८७ रोजी राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाची स्थापना केली. या आयोगाचा प्रमुख उद्देश ग्रामीण कष्टकरी व शेतमजूरांचे राहणीमान उंचावण्यासाठी कोणती ठोस कृती करता येईल हे पाहणे होते, त्याप्रमाणे

या आयोगाने आपला अहवाल ३१ जुलै १९९१ रोजी केंद्र सरकारला सादर केला. त्यात शेतमजूरांची सामाजिक सुरक्षीतता, कामाचे तास, किमान वेतनाची काटेकोर अंमलबजावणी, शेतमजुरांची नोंदणी, तंटे सोडविण्याची यंत्रणा, ओळखपत्र इत्यादि बाबींचा समावेश असलेल्या सर्वंकश कायद्याचो शिफारस केली आहे. राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाच्या शिफारशीनुसार केन्द्र शासन कायदा करेल पण तो पर्यंत महाराष्ट्र शासनाने केरळ व त्रिपुराचे धर्तीवर व आयोगाच्या शिफारशी लक्षात घेऊन स्वतंत्र सर्वंकश शेतमजूर कायदा त्वरित करावा आणि हा कायदा भंग करणे हा दखलपात्र फौजदारी गुन्हा होईल अशी तरतूद कायद्यात करावी, वेठबिगार कायदा, महिला अत्याचाराबाबत कायदा, व दलित अत्याचार कायद्याप्रमाणे तो सिद्ध करण्याची जबाबदारी कायदाभंग करणावर टाकली जाईल ते पाहावे.

## शेतमजुरांचे किमान वेतनाची तात्काळ पुनर्रचना करा

शेतमजुरांच्यासाठीचा कायदा मग तो केन्द्र सरकारने करावयाचा असो वा राज्य सरकारने, त्यात काही आवश्यक अवधी लागणार आहे, तो पर्यंत शेतमजूरांना सध्याच्या हालाकीच्या परिस्थितीतून काही प्रमाणात का होईना दिलासा मिळावा त्यांना वाढत्या महागाईस तोंड देता यावे म्हणून त्यांचे किमान वेतनात विना विलंब वाढ झाली पाहिजे अशी मागणी आहे.

महाराष्ट्र राज्यात २२ एप्रिल १९८८ रोजी म्हणजे साडेचार वर्षापूर्वी शेतमजूरांची किमान वेतनाची पुरर्रचना केली होती, तेव्हा स्पष्टपणे असे नमूद केले होते की, दर दोन वर्षांनी या वतनाची पुनर्रचना केली जावी आणि दर सहा महिन्यानी या वेतनात महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्याची तरतूद असावी, पण ह्या शिफारशीकडे राज्य शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले दिसते आहे, याच प्रकारची शिफारस राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाने आपल्या अहवालात केन्द्र सरकारला केली असून, डिसेंबर १९९० पासून देशभरातील शेतमजूरांना किमान वेतन म्हणून वीस रुपयापेक्षा कमी मजुरी असता कामा नये असे स्पष्टपणे नमूद केले आहे. पण या कोणत्याही शिफारशीकडे राज्य शासन गांभीर्याने पाहते आहे असे दिसत नाही.

१९९० मध्ये मजूर मंत्र्यांचे परिषदेतील निर्णयाप्रमाणे शेत मजूरांचे किमान वेतनात दर दोन वर्षानी वाढ व्हायला हवी होती किंवा महागाई निर्देशांक ५० पाईन्टने वाढला तर ते पुनर्रनिर्धारित करायचे होते. १९८८ साली तेव्हा किमान वेतनाची पुनर्रचना झाली तेव्हा महागाई निर्देशांक ७७७ होता तो चार वर्षानंतर म्हणजे जुलै १९९२ मध्ये १३०४ इतका झाला. महागाई एवढ्या मोठा प्रमाणात वाढली पण राज्यातील शेतमजूरांचे वेतनात एक पैशानेही वाढ झाली नाही हे वास्तव आहे. ज्या घटकावर संपूर्ण ग्रामीण अर्थ व्यवस्था अवलंबून आहे त्याचेकडे ज्या पद्धतीने ( क्रिमिनल निग्लीजन्स ) दुर्लक्ष होते. यातून शेतमजूरा सारख्या उपेक्षित व दुर्बल घटकाविषयी अक्षम्य बेपर्वाईच राज्यकर्त्यांची दिसून येते हे खेदाने म्हणावे लागते.

किमान वेतन निर्धारीत केल्यावर महागाईमध्ये जसजशी वाढ होईल त्याप्रमाणे वाढीव महागाई भत्ता ग्रामीण भागातील मजुरांना देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने यापूर्वीच घेतला आहे. उदा. महाराष्ट्रातील बांधकाम मजुरांना ५ ऑक्टोबर १९८४ च्या निर्णयानुसार १ जानेवारी १९८८ ते ३० जून १९८८ या कालावधीसाठी दररोज १३ रुपये ६० पैसे हा महागाई भत्ता होता, तो आता वाढून १ जुलै १९९२ ते ३१ डिसेंबर १९९२ या कालावधीसाठी ३७ रुपये ५० पैसे झाला आहे. तसेच वन कामगारांना १५ मे १९८६ च्या निर्णयानुसार १ ऑगस्ट १९८७ ते ३० जुलै १९८८ या काळासाठी २ रुपये ७२ पैसे महागाई भत्ता होता तो आता १ ऑगस्ट १९९२ ते ३१ जुलै १९९३ साली दर दिवसाला १३ रुपये झाला आहे. म्हणजेच बांधकामगारांच्या व वनकामगारांच्या महागाई भत्यात अनुक्रमे २७५ टक्के व ४७८ टक्के वाढ झाली आहे. वन कामगार व बांधकामगार हे शेतमजूरांसारखेच ग्रामीण भागातील अग मेहनती मजूर आहेत म्हणून त्यांना मिळालेला न्याय शेतमजूरांना देखील मिळणे आवश्यक आहे.

किमान वेतन ठरवितांना कुटुंबामधील युनिटस् किती असावीत व त्यामध्ये मिळवते किती धरावे हा प्रश्न महत्वाचा ठरतो. १५ व्या त्रिपक्षीय परिषदेमध्ये शेतमजूरांचे किमान वेतन ठरवितांना नवरा-बायको व दोन मुले अशी तीन युनिटस् आणि त्यातील एकजण कमावता असे धरावे असा निर्णय झाला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये किमान वेतन ठरविण्याची काही मार्गदर्शक सूत्रे ठरविली होती, त्यामध्ये ही वरील तत्वांचा पाठपुरावा केला आहे. अगदी अलिकडे राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाने ३१ जुलै १९९१ ला दिलेल्या

अहवालामध्येही किमान वेतन ठरवितांना ३ युनिटस व त्यातील एक कमावता धरावा असे म्हटले आहे. आपल्याकडे मात्र पागे समितीने दिलेल्या अहवालानुसार किमान वेतन ठरवतांना कुटुंबात दोन जण कमावते धरावेत असे म्हटले आहे आणि त्यानुसारच सध्याचे आपल्याकडील वेतन ठरविले गेले आहे. आता मात्र किमान वेतनाची पुरर्रचना करतांना वरील बाबींचा जाणीवपूर्वक विचार झाला पाहिजे व कुटुंबातील एकच माणूस कमावता आहे असे गृहीत धरून शेत मजुराचे किमान वेतन निर्धारीत केले पाहिजे.

१५ व्या त्रिपक्षीय परिषदेमध्ये केलेल्या शिफारनुसार शेतमजूरांचे किमान वेतन पुनर्निर्धारीत करताना शेती व्यवसायामध्ये झालेल्या नव-नवीन सुधारणा, वापरात येणारी यंत्र व तंत्र याचा विचार करता कामाची वर्गवारी करावी लागेल. शेतमजुरीमध्ये लागणाऱ्या कुशलतेप्रमाणे व कामातील संभाव्य धोक्याचा विचार करून त्यांची अकुशल, अर्धकुशल व कुशल अशी वर्गवारी करणे आवश्यक आहे, केन्द्र सरकार अशी वर्गवारी करूनच किमान वेतन निश्चित करते हे या ठिकाणी लक्षात ठेवले पाहिजे.

महाराष्ट्र शेतमजूरांचे किमान वेतन ठरवतांना ते ४ परिमंडळांना वेगवेगळे ठरविले जाते, त्यातील परिमंडळ ४ हा कोरडवाहू व अवर्षणग्रस्त भागाचा आहे. खरे पाहता या झोनमधील शेतमजुरांना कमी वेतन देणे हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. इतर बऱ्याचशा राज्यात किमान वेतन ठरविताना आपल्यासारखी परिमंडळे ठरवलेली नाहीत. शेतमजूरांना सर्वत्र सारखेच काम करावे लागते, परंतु औद्योगिकीकरण झालेले पट्टे, बागायती व कोरडवाहू जमीन याचा विचार करून महाराष्ट्र राज्यात फक्त दोनच परिमंडळे ठेवून किमान वेतन निश्चित केले जावे.

प्रचलित किमान वेतन कायद्यानुसार शेतमजूराने ठरविलेल्या कामापेक्षा जास्त काम केल्यास त्यांना जादा कामाचा दीडपट मोबदला देण्याची तरतूद आहे, मात्र औद्योगिक कामगारांनी जादा काम केल्यास नेंहमीच्या पगाराच्या दुप्पट मोबदला दिला जातो म्हणून शेतमजुरांना देखील जादा कामाची मजूरी दीडपट न देता दुप्पट ठरविली जावी. त्याप्रमाणे किमान वेतन कायद्याप्रमाणे कामाचे तास ७ ठरविण्यात आलेलें आहेत. परंतु मध्यंतरी नेमलेल्या विखे पाटील समितीच्या शिफारशीनुसार कामाचे तास वाढवून ते ८ करण्याचे शासनाने ठरविले आहे. शेतमजुरांचे काम हे काबाडकष्ट व अंगमेहनतीचे असल्या कारणाने पुढीलप्रमाणेच प्रत्यक्ष कामाचे ७ तास व १ तास विश्रांतीचा असे ठरविण्यात यावे.

अंगमेहनती कष्टकऱ्यांचे किमान वेतन ठरवितांना नेहमीच एका प्रश्नाची चर्चा होते तो म्हणजे कष्टकऱ्यांच्या अन्नाची गरज कशी निश्चित करायची. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील मार्गदर्शक सुचनांनुसार डॉ. अक्राईडच्या मताने दर युनिटला रोज २७०० कॅलरीज धरायच्या आहेत. डॉ. अभय बंग यांनी केलेल्या अभ्यासान्वये अंगमेहनतीचे काम करणाऱ्या ग्रामीण कष्टकऱ्यास रोज किमान ३२०० कॅलरीजची आवश्यकता असते आणि इंडियन कॉन्सील फॉर मेडिकल रिचर्स ही वैद्यकीय संशोधनातील भारतातील सर्वोच्च अधिकृत संस्था आहे. या संस्थेने वेगवेगळ्या व्यवसायातील व्यक्तीच्या कॅलरीजच्या आवश्यकता ठरलेल्या आहेत. वैद्यकीय क्षेत्रात सर्वत्र त्यांना मान्यता आहे. शेतमजूराचे किमान वेतन ठरवितांना आय. सी. एम. आर. ची आकडेवारी सर्वात जास्त उपयुक्त ठरणार आहे. त्यांच्या आकड्यामध्ये वेगवेगळ्या वयोगटातील कॅलरीजच्या आवश्यकताही नेमक्या दिलेल्या आहेत.

१५ वी मजूर मंत्री परिषद आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेतमजूरांचे किमान वेतन ठरवितांना या मार्गदर्शक सूत्रांचा समावेश आहे. ( १ ) नवरा-बायको व दोन मुले म्हणजे ३ युनिटस व एकजण कमावता. (२) अन्नाची गरज आय. सी. एम. आर. च्या आकडेवारीनुसार (३) दरवर्षी कुटुंबाची ७२ यार्ड कापडाची गरज. ( ४ ) सरकारी गृहयोजनेनुसार ठरविण्यात आलेल्या किमान जागेसाठीचे भाडे ( ५ ) इंधन व वीज यासाठीचा खर्च वरील २, ३ व ४ च्या एकूण खर्चाच्या २० टक्के एवढा धरायचा आहे. (६) मुलांचे शिक्षण, वैद्यकीय सेवा, करमणूक, सण-उत्सव या सर्वांसाठी एकूण किमान वेतनाच्या २५ टक्के एवढी रक्कम किमान वेतनात किमान वेतनाचा भाग म्हणून धरण्यात यावी. ( १९९१ सी. एल. आर. पान नं. ८६३ रॅन्हकॉस ब्रेट वि. कामगार–सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय) वर नमूद केलेल्या सूत्रांचा विचार केला तर महाराष्ट्रातील शेतमजूराला किमान वेतन म्हणून दर दिवशी ७८.६० मिळायला पाहिजे. ( परिशिष्ट १ पहा ) हे किमान वेतन म्हणून केन्द्र शासन, मजूर मंत्री परिषद, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सूचना, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल, आय. सी.

एम. आर. इ. नी वेळोवेळी सुचविलेल्या सूत्र, अभ्यास व निर्णयाचे अनुषंगाने काढण्यात आले आहे. तरीपण आम्ही समन्वय समिती म्हणून या विषयावर खुलेपणाने चर्चा करण्यास तयार आहोत.

किमान वेतनाची वरील प्रमाणे फेररचना करून प्रत्यक्ष निर्णय होण्यास काही कालावधी लागू शकते. परंतु राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाने सुचवल्याप्रमाणे डिसेंबर ९० मध्ये ग्रामीण मजुरांना कमीत कमी २० रुपये किमान वेतन दिले जावे. शेतमजूरांच्या किमान वेतनाची पुनर्रचना होईपर्यंत आयोगाने सुचवलेल्या या शिफारशीची तात्काळ अंमलबजावणी झाली पाहिजे, मात्र डिसेंबर ९० नंतर वाढलेल्या महागाई निर्देशकाशी हे वेतन जोडून घेतले पाहिजे. बांधकामगारांना ज्याप्रमाणे वाढीव प्रति पाईंट प्रति दिन ५ पैसे दिले जातात. त्याप्रमाणे ते शेतमजूरालाही दिले जावे म्हणजे महाराष्ट्रातील १ ते ४ परिमंडळातील शेतमजूरांना अनुक्रमे रु. ४५.०५, ३९.०५, आणि ३५.०५ आणि परिमंडळ ४ ला ३२.०५ किमान वेतन होईल. वाढती महागाई लक्षात घेता वरील वेतनाची तात्काळ अंमलबजावणी करावी अशी समन्वय समिती मागणी करीत आहे.

## रोजगार हमी योजना व किमान वेतन :

१९७२ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या भयंकर दुष्काळाच्या पार्श्वभूमिवर व ग्रामीण कष्टकऱ्याच्या चळवळीच्या रेटयामुळे रोजगार हमी योजनेचा जन्म झाला. बेरोजगारी, वेठबिगारी, बांधील मजूर, स्थलांतर इत्यादी आमानुष परिस्थितीमुळे या कायद्यामुळे काही प्रमाणात का होईना शेतमजूरांना दिलासा मिळाला, पण गेल्या ५–६ वर्षापासून ही योजना मोडीत काढण्याच्या हेतूने शासनाची पावले पडत आहेत. ग्रामीण कष्टकरी व त्यांच्यामध्ये काम करणाऱ्या संघटना, रोजगाराची व योग्य वेतनाची सातत्याने मागणी करत असतांना, शासन मात्र या मागण्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करत आहे. रोजगार हमीवरील मजूरांना वेतनासोबत दिले जाणारे धान्य बंद करणे, ८ दिवसाऐवजी १५ दिवसांनी मजूरी देणे, रोजगाराची शाश्वती नसणे आणि किमान वेतन अत्पल्प ठेवणे यामुळे खरेतर रोजगार हमीवरील मजूरांची संख्या रोडावली आहे. आजच्या १२ रुपये या वेतनात कुटुंब जगवणे हे केवळ अशक्य असल्यामुळे ग्रामीण काटकरी रोजगार हमीवरील कामावर जाण्याऐवजी स्थलांतरीत होणे पसंत करतो हे लक्षांत घेणे आवश्यक आहे.

रोजगार हमीवरील बहुसंख्य कामे ही बांधकाम व्यवसायातील व बांधकाम मजूरांसाठी ठरवलेल्या किमान वेतनात समाविष्ट होणारी असतात, पण शासन मात्र आपली नित्याच्या नियोजनातील कामे रोजगार हमी योजनेत कमी वेतनावर करून घेऊन ग्रामीण मजूरांची फसवणूक करत आहे हे खेदाने नमूद करावे लागते. बांधकाम कामगाराचे व वन कामगारांचे वेतन महागाई निर्देषांकाशी जोडलेले आहे व या दोन्ही व्यवसायातील महागाई भत्ता १९८८ ते ९२ पर्यंत अनुक्रमे २७५ टक्के व ४७५ टक्के वाढलेला आहे. मात्र रोजगार हमीवरील मजूरांना, शेतमजूरांसाठी १९८८ मध्ये ठरविण्यात आलेल्या किमान वेतनातच (महागाई भत्त्याशिवाय राबवून घेतले जाते. हाच अनुभव जवाहर रोजगार हमी योजना अंतर्गत चालणाऱ्या कामाबाबतही येतो. यासंबंधी केन्द्र शासनाने जे मान्युअल काढले आहे ( जवाहर रोजगार योजना मॅन्युअल एप्रिल १९९० पान क्र. १६ ) त्यात स्पष्ट असे नमूद केले आहे की, ज्या व्यवसायातील कामे मंजूर करत असतील त्यांना त्या व्यवसायातील प्रचिलित किमान वेतन दिले गेले पाहिजे, असे असतांना जवाहर रोजगार योजनेची, रोजगार हमी योजनेशी सांगड घालून तीही कामे शेतमजूरांच्या वेतनात करवून घेतली जातात हा सार्वत्रिक व संतापजनक अनुभव आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईत रोजगार हमी योजनेवर मिळणाऱ्या अत्यल्प वेतनावर ग्रामीण मजूर जगू शकत नाही हे लक्षात घेता रोजगार हमीच्या कामाची शेतमजूरांशी घातलेली सांगड बदलून रोजगार हमी कामावरील वेतनाचे दर त्या त्या व्यवसायातील किमान वेतनाशी निगडीत करावेत अशी आम्ही मागणी करीत आहोत.

रोजगार हमी उपकर बसवून महाराष्ट्र सरकार जो निधी जमा करते त्या निधीतील सर्व रक्कम रो. ह यो. च्या कामावर खर्च होत नाही ही गेल्या काही वर्षातील वस्तुस्थिती आहे. एका बाजूला रोजगार हमी निधीतील पैसा सरकारी तिजोरीत पडून आहे वा इतरत्र वापरला जातो आणि दुसऱ्या बाजूला शेतमजूरांसाठी या योजनेखाली कामे निघत नाहीत. रोजगार हमी उपकर हा ग्रामीण कष्टकऱ्यांच्या रोजगार निर्मितीसाठी बसवला असेल तर त्यातून जमा झालेल्या निधीतील सर्व पैसा रोजगार निर्मितीच्या

कामासाठी व त्या कामावरील मजूरांना यथोचित असे किमान वेतन देण्यासाठी खर्च झाला पाहिजे.

किमान वेतनाच्या फेररचनेची वाट न पाहता राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रातील चारही परिमंडळामध्ये परिशिष्ट २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) किमान वेतन आणि महागाई भत्ता देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घोषित करावा व त्याची अंमलबजावणी २ ऑक्टोबर १९९२ महात्मा गांधी जयंतीपासून करावी असे आवाहन समन्वय समिती करते. आयोगाच्या शिफारशी व वाढलेला महागाई निर्देषांक लक्षात घेता परिमंडळ १ ला किमान वेतन म्हणून रु ४५.०५, परिमंडळ २ ला रु. ३९.०५, परिमंडळ ३ ला रु. ३५.०५ आणि परिमंडळ ४ ला रु. ३२.०५ दिले गेले पाहिजे. तसेच परिशिष्ट २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर ६ महिन्याचे कालावधीमध्ये वाढलेल्या महागाई निर्देषांकातील फरकही शेत मजूरांना देण्यात यावा अशी आम्ही समन्वय समितीतर्फे मागणी करतो.

# परिशिष्ट १

## किमान वेतनाचे सूत्र :

शेतमजूरांचे किमान वेतन ठरवितांना दुसरी पंचवार्षिक योजना, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल व इंडियन कॉन्सिल फॉर मेडिकल रिचर्स इत्यादींनी सुचवलेल्या सुत्रानुसार ( नवरा-बायको व दोन मुले म्हणजे ३ युनिटस आणि त्यातील एक कमावता ) द्यावयाचे. शास्त्रीय पद्धतीने काढलेले किमान वेतन खालीलप्रमाणे असेल.

( १ ) अन्नाची गरज : पुरुष – ३९०० कॅलरीज, स्त्री – ३००० कॅलरीज, मुलगा/मुलगी – (वय वर्षे १३) २५०० कॅलरीज, मुलगा/मुलगी –(वय वर्षे ७) १८०० कॅलरीज, म्हणजेच एका कुटुंबाची एका दिवसाची आवश्यकता ११२०० कॅलरीज. ऑगस्ट ९२ च्या बाजार भावाप्रमाणे २७३७ कॅलरीजसाठी रुपये ११ ७५ खर्च येतो म्हणजेच ११२०० कॅलरीजना ४८ रुपये खर्च येणार.

( २ ) **कपडयांची गरज** – कपडयाची दरवर्षीची गरज ७२ यार्ड म्हणजे ६६.५ मीटर कपडा सरासरी रु. १५ मीटर जरी धरला तरी कपडयावर ग्रामीण कष्टकरी कुटुंबाला किमान रोज रु. २.७५ खर्च करावे लागणार.

( ३ ) **निवारा** – सरकारी गृह योजनेनुसार ठरविण्यात आलेले किमान जागेसाठीचे भाडे धरावयाचे आहे. दर महिन्याला रु. ५० धरले तरी एका दिवसाचे रु. १.६५ होतात.

( ४ ) **इंधन व वीज यासाठीचा खर्च** – वरील १+२+३ च्या एकूण खर्चाच्या २० टक्के धरायचा आहे. तो रु. १०.५० होईल. ( ४८ + २.७५ + १.६५ = ५२.४० याचे २० टक्के म्हणजे १०.५० रु. होतात ).

( ५ ) सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार मुलांचे शिक्षण, वैद्यकीय सेवा, करमणूक, सण, उत्सव इत्यादी खर्चासाठी एकूण किमान वेतनाच्या २५ टक्के एवढी रक्कम धरावयाची आहे. ती रु. १५.७० एवढी होते.

म्हणजेच शेतमजूरास शास्त्रीयदृष्टया मिळण्यास पात्र असलेले किमान वेतन हे १ ते ५ ची जी बेरीज होईल ते असेल. ( ४८ + २.७५ + १.६५ + १०.५० + १५.७० = ७८.५० ) याचाच अर्थ शेतमजूरास सध्याची महागाई लक्षात घेता ७८.६० एवढे किमान वेतन मिळायला हवे.

# परिशिष्ट २

**राष्ट्रीय ग्रामीण मजूर आयोगाची किमानवेतनासंबंधी शिफारस :**

या आयोगाने सुचवल्याप्रमाणे ग्रामीण मजूरांना डिसेंबर ९० मध्ये किमान वेतन म्हणून २० रुपये मिळायला हवे होते. त्यामध्ये दर ६ महिन्यांनी वाढणाऱ्या महागाईनुसार खास भत्ता द्यावयाचा आहे, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील शेतमजूरांचे किमान वेतन ठरविताना सध्याच्या परिमंडळानुसार परिमंडळ ४ चे वेतन रु. २० ठरते, याच न्यायाने अन्य परिमंडळाची किमान वेतने याप्रमाणे–

| परिमंडळ | सध्याचे किमान वेतन | डिसेंबर ९० मध्ये होणारे किमान वेतन |
|---|---|---|
| १ | रु. २० | रु. ३३ |
| २ | रु. १६ | रु. २७ |
| ३ | रु. १४ | रु. २३ |
| ४ | रु. १२ | रु. २० |

वरीलप्रमाणे होणाऱ्या मूळ किमान वेतनात दर ६ महिन्यांनी चढणाऱ्या निर्देषांकाप्रमाणे प्रत्येक वाढीव निर्देषांकास प्रति पॉईंट प्रति दिन ५ पैसे ( बांधकाम कामगाराप्रमाणे ) खालीलप्रमाणे खास महागाई भत्ता होईल.

| तपशील | जाने. ९१ ते जून ९१ | जुलै ९१ ते डिसेंबर ९१ | जाने. ९२ ते जून ९२ |
|---|---|---|---|
| वाढलेला निर्देशांक | ६७ पॉईंट | १०७ पॉईंट | ६७ पॉईंट |
| महागाई भत्ता | रु. ३.३५ | रु. ५.३५ | रु. ३.३५ |

प्रत्येक परिमंडळासाठी द्यावे लागणारे किमान वेतन आणि वाढीव निर्देषांकाप्रमाणे द्यावयाचा खास महागाई भत्ता खालीलप्रमाणे होईल.

| कालावधी | परिमंडळ १ | परिमंडळ २ | परिमंडळ ३ | परिमंडळ ४ |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर ९० | रु. ३३ | रु. २७ | रु. २३ | रु. २० |
| जाने. ९१ ते जून ९१ (रु. ३.३५) | रु. ३३+३.३५ = रु. ३६.३५ | रु. २७+३.३५ = रु. ३०.३५ | रु. २३+३.३५ = रु. २६.३५ | रु. २०+३.३५ = रु. २३.३५ |
| जुलै ९१ ते डिसेंबर ९१ (रु. ३.३५+५.३५ रु ८.७०) | रु. ३३+८.७० = रु. ४१.७० | रु. २७+८.७० = रु. ३५.७० | रु. २३.८.७० = रु. ३१.७० | रु. २० ८.७० = रु. २८.७० |
| जाने. ९० ते जून ९२ (३.३५+५.३५+३.३५ = १२.०५) | रु. ३३+१२.५ = रु. ४५.०५ | रु. २७+१२.०५ = रु. ३९.०५ | रु. २३+१२.०५ = रु. ३५.०५ | रु. २०.१२.०५ = रु. ३२.०५ |

महाराष्ट्रातील शेतमजूरांना तात्पुरता दिलासा देण्यासाठी वरील किमान वेतनाची ताबडतोब अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

प्रकाशक : साथी सुभाष लोमटे, शेतमजूर व रोजगार हमी कामगार समन्वय समिती.